**ठळक बातम्या**

- भारत आणि पाकिस्तान दरम्यान सुरू असलेली लष्करी कारवाई थांबवण्यावर दोन्ही देशांची सहमती

- महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश दरम्यान तापी खोरे मेगा रिचार्ज प्रकल्पाच्या करारावर स्वाक्षऱ्या, राज्यातली दोन लाख ३० हजार हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार

- नैर्ऋत्य मोसमी पावसाचं येत्या २७ मे रोजी केरळमधे आगमन होईल, असा हवामान विभागाचा अंदाज

**आणि**

- प्रसिद्ध रंगभूषाकार विक्रम गायकवाड यांचं निधन

**<><><><><>**

भारत आणि पाकिस्ताननं परस्परांविरोधातली लष्करी कारवाई थांबवून शस्त्रसंधी करण्याचा निर्णय घेतला आहे. पाकिस्तानच्या सैनिकी कारवाई महासंचालकांनी आज दुपारी भारताच्या सैनिकी कारवाई महासंचालकांशी दूरध्वनीवरून संवाद साधला. आज संध्याकाळी पाच वाजल्यापासून जमीन, हवाई आणि समुद्री मार्गांनी सुरू असलेले हल्ले आणि सैनिकी करवाया थांबवण्याचा निर्णय या दोघांनी घेतल्याची माहिती परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे सचिव विक्रम मिसरी यांनी आज निवेदनात दिली.

दरम्यान, भारतानं सर्व प्रकारच्या दहशतवादाविरुद्ध नेहमीच कणखर भूमिका घेतली असून यापुढेही ती तशीच राहील, अशी ग्वाही परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टद्वारे दिली.

<><><><><>

भारत आणि पाकिस्तानमध्ये सध्या सुरू असलेल्या तणावादरम्यान, आज संध्याकाळपासून शस्त्रसंधी करण्यावर दोन्ही देशांची सहमती झाल्याचा पुनरुच्चार कमांडर रवी नायर यांनी आज विशेष वार्ताहर परिषदेत केला. पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताची प्रतिक्रिया अतिशय जबाबदार होती, मात्र पाकिस्ताननं चुकीची माहिती पसरवण्याचा खूप प्रयत्न केला, असंही त्यांनी नमूद केलं. पाकिस्तानच्या हल्ल्यांमध्ये भारताचं मोठं नुकसान झाल्याचे पाकिस्ताननं केलेले दावे साफ खोटे असल्याचा पुनरुच्चार कर्नल सोफिया कुरेशी यांनी केला. भारताचं सार्वभौमत्व आणि अखंडता अबाधित ठेवण्यासाठी सशस्त्र दलं वचनबद्ध असल्याची ग्वाही त्यांनी दिली. भारतानं पाकिस्तानातल्या एका मशिदीला लक्ष्य केल्याचा पाकिस्तानचा दावाही असत्य असल्याचं विंग कमांडर व्योमिका सिंग यांनी स्पष्ट केलं. भारत धर्मनिरपेक्ष देश असून कोणत्याही प्रार्थनास्थळांवर भारतानं हल्ला केलेला नाही. फक्त भारतविरोधी कारवाया करणाऱ्या जागांना लक्ष्य केल्याचं त्यांनी सांगितलं आणि या हल्ल्यांमध्ये पाकिस्तानचं मोठं नुकसान झाल्याची माहितीही दिली. सध्या शस्त्रसंधी लागू करण्याला दोन्ही देशांनी संमती दिली आहे, मात्र परिस्थिती आणखी बिघडवण्याचा कोणताही प्रयत्न पाकिस्तानने केल्यास त्याला भविष्यात सडेतोड उत्तर मिळेल, असा पुनरुच्चार कमांडर रवी नायर यांनी केला.

<><><><>

भविष्यात घडणाऱ्या कोणत्याही दहशतवादी कृत्याला देशाविरुद्ध युद्धाची कृती मानून त्याला प्रत्युत्तर देण्याचा निर्णय भारतानं घेतला आहे, अशी माहिती सरकारी सूत्रांनी दिली आहे. भविष्यात कुरापाती काढल्यास ऑपरेशन सिंदूर सारखं चोख  प्रत्युत्तर दिलं जाईल, असाही इशारा देण्यात आला आहे.

<><><><>

जैश ए मोहम्मद आणि लष्कर ए तैयबा या दहशतवादी संघटनांचे ५ दहशतवादी ऑपरेशन सिंदूरमधे मारले गेल्याचं अधिकृत सूत्रांनी सांगितलं. मुदस्सर खादियान खास उर्फ अबु जुंदाल, मौलाना मसूद अझहरचा मेव्हणा हाफिज मुहम्मद जमील, मोहम्मद युसुफ अझहर, खालीद उर्फ अबु अकाशा आणि मोहम्मद हसन खान अशी त्यांची नावं आहेत. गेल्या गुरुवारी राबवलेल्या ऑपरेशन सिंदूर मोहिमेत ते ठार झाले.

<><><><>

देशाच्या रक्षणासाठी जम्मू-काश्मीरमधे नियंत्रण रेषेवर कर्तव्य बजावतांना शहीद झालेले वीर जवान एम. मुरली नाईक हे मुंबईच्या  घाटकोपर उपनगरातल्या कामराज नगरचे रहिवासी होते. त्यांच्या पार्थिवावर आंध्रप्रदेशातल्या त्यांच्या मूळ गावी कल्ली थांडा इथं लष्करी इतमामाने अंत्यसंस्कार करण्यात आले. राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी तिथं जाऊन आदरांजली अर्पण केली.

<><><><>

महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश आंतरराज्य नियंत्रण मंडळाची २८वी बैठक आज मध्य प्रदेशची राजधानी भोपाळ इथं पार पडली. तापी खोरे मेगा रिचार्ज प्रकल्पाच्या सामंजस्य करारावर दोन्ही राज्यांच्या स्वाक्षऱ्या झाल्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन या कार्यक्रमाला उपस्थित होते.

तापी मेगा रिचार्ज जगातलं एक आश्चर्य आहे. या परियोजनेमुळे महाराष्ट्राची दोन लाख ३० हजार हेक्टर आणि मध्य प्रदेशची सुमारे एक लाख ३१ हजार हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले. महाराष्ट्रात अकोला, बुलढाणा आणि अमरावती या तीन जिल्ह्यांतल्या खाऱ्या पाण्याच्या क्षेत्रावर या योजनेचा प्रभाव पाहायला मिळणार आहे. येथील शेतकऱ्यांचं जीवन बदलणार आहे, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला. या योजनेला आंतरराज्यीय परियोजनेअंतर्गत आणावं, अशी विनंती दोन्ही राज्यं केंद्र सरकारला करणार असल्याचं फडणवीस यांनी सांगितलं. प्रधानमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली आपण आपापल्या राज्यांच्या विकासासाठी परस्पर सहकार्याने काम करत राहू, असा विश्वास मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांनी व्यक्त केला. या प्रकल्पामुळे महाराष्ट्राला १९ पूर्णांक ३६ शतांश टीएमसी पाणी मिळणार असून मध्यप्रदेशला ११ पूर्णांक ७६ शतांश टीएमसी पाणी मिळणार आहे. विशेषतः नागपूर शहराची तहान भागणार आहे. ही योजना जगातली सर्वात मोठी जल पुनर्भरण योजना आहे.

**<><><><><>**

आकाशवाणी मुंबई केंद्रावरून प्रसारित होणाऱ्या काही बातमीपत्रांच्या वेळेत बदल करण्यात आला आहे. त्यानुसार दुपारी ३ चं प्रादेशिक बातमीपत्र ३ वाजून २० मिनिटांनी, संध्याकाळी पाच वाजता प्रसारित होणारं बातमीपत्र ५ वाजून २० मिनिटांनी तर रात्री ८ वाजून ५ मिनिटांनी प्रसारित होणारं राष्ट्रीय बातमीपत्र ८ वाजून २० मिनिटांनी प्रसारित होईल. आकाशवाणी मुंबईच्या प्रादेशिक वृत्तविभागाचा कार्यक्रम वृत्तविशेष आणि अर्थविशेष संध्याकाळी सव्वासात ऐवजी रात्री साडेआठ वाजता प्रसारित होईल. पुढील आदेश येईपर्यंत हे बदल कायम राहतील.

**<><><><><>**

नैर्ऋत्य मोसमी पावसाचं आगमन येत्या २७ मे रोजी केरळात होईल, असा हवामानशास्त्र विभागाचा अंदाज आहे. यात ४-५ दिवसांचा फरक पडू शकतो. १३ मे च्या आसपास नैर्ऋत्य मोसमी पाऊस बंगालच्या उपसागरात आणि अंदमान बेटांवर दाखल होण्याची शक्यता आहे, असं हवामान विभागाचे प्रवक्ते उमाशंकर दास यांनी सांगितलं. दरवर्षी मोसमी पाऊस साधारणपणे १ जून रोजी केरळात दाखल होतो.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याची शक्यता आहे. या काळात सोसाट्याचे वारे वाहण्याची शक्यता असल्याचं हवामानशास्त्र विभागाच्या पत्रकात म्हटलं आहे.

**<><><><><>**

ज्येष्ठ रंगभूषाकार विक्रम गायकवाड यांचं आज मुंबईत दीर्घ आजारानं निधन झालं. ते ६१ वर्षांचे होते. पानिपत, बेल बॉटम, उरी, दंगल, पिके यासारख्या गाजलेल्या चित्रपटांसाठी, तर पावनखिंड, फत्ते शिकस्त, शेर शिवराज यासारख्या ऐतिहासिक चित्रपटांसाठी त्यांनी रंगभूषाकार म्हणून काम केलं. विक्रम गायकवाड यांना सात वेळा राष्ट्रीय पुरस्कारानं गौरवण्यात आलं होतं. रुपेरी पडद्यावरच्या व्यक्तिरेखेच्या गरजेनुसार कलाकारांच्या चेहऱ्यात आणि रुपरेषेत बदल करण्याची जादू त्यांच्या ब्रशमधे होती.

**<><><><><>**

आकाशवाणी नागपूरचे माजी केंद्र संचालक गुणवंत थोरात यांचं आज सकाळी नागपूर इथल्या एका खाजगी रुग्णालयात निधन झालं. ते ७८ वर्षांचे होते. थोरात यांच्या पार्थिवावर उद्या सकाळी अत्यंसंस्कार केले जाणार आहेत. थोरात यांनी आपल्या कार्यकाळात आकाशवाणीवर अनेक सृर्जनशील उपक्रम राबवले होते.

<><><><><>

शाश्वत विकास उद्दिष्ट २०३० ला अनुसरून, भारतात  माता आणि बाल मृत्यूच्या दरात सातत्याने घट होताना दिसत आहे. रजिस्ट्रार जनरल ऑफ इंडिया ने जारी केलेल्या अहवाला नुसार, देशात दर  एक लाख बालकांच्या जन्मा मागे माता मृत्युदर १३० इतका होता. तो आता कमी होऊन ९३ वर आला आहे. बालमृत्यू दर २०१४ मध्ये ३९ होता, तो २०२१ मध्ये कमी होऊन २७ वर आला आहे. २०१४ मध्ये नवजात शिशु मृत्युदर प्रति १ हजार  २६ इतका होता, तो २०२१ मध्ये १९ वर आला. पाच वर्षां खालच्या बालकांचा मृत्युदर २०१४ मध्ये दर हजार जन्मांमागे ४५ होता, तो २०२१ मध्ये  ३१ वर आला. नवजात बालकांमधलं  लिंग गुणोत्तरही २०१४ मध्ये ८९९ होतं. त्यामध्ये सुधारणा होऊन २०२१ मध्ये ते ९१३ वर आल्याचं या अहवालात म्हटलं आहे.

<><><><><>

खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्र ७१ पदकांची कमाई करत पदक तालिकेत अव्वल स्थानावर आहे. यात २६ सुवर्ण, २२ रजत आणि २३ कांस्यपदकांचा समावेश आहे. कर्नाटक ३९ तर राजस्थान २३ पदकांसह दुसऱ्या आणि तिसऱ्या स्थानावर आहेत. महिलांच्या २५ मीटर पिस्तूल नेमबाजी स्पर्धेत दिल्लीच्या नाम्म्या कपूरनं सूवर्ण पदक, मध्य प्रदेशच्या अंजली भागवतनं रजत तर राजस्थानच्या खनक व्यासनं कांस्यपदक पटकावलं.

<><><><><>

मुंबईत अंधेरी पूर्व आणि पश्चिमेला जोडणाऱ्या गोपाळकृष्ण गोखले रेल्वे उड्डाणपूल प्रकल्पाचं लोकार्पण राज्याचे माहिती तंत्रज्ञान आणि  सांस्कृतिक कार्य मंत्री तसंच मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते उद्या संध्याकाळी होणार आहे.

//<><><><><>//